# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील नागरिकांचा विकास होण्यासाठी सामाजिक न्याय विभागातर्फे स्वयंसहायता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांचे वाटप करणेबाबत**

**(१) ३५७३३ (२८-०१-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नागरिकांचा विकास होण्यासाठी सामाजिक न्याय विभागातर्फे स्वयंसहायता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांचे वाटप करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्याच्या तुलनेत चार वर्षात केवळ ८५ ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आल्याने ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या आणि नवबौध्दांच्या विकासावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाज कल्याण विभागाच्या शासकीय योजनांची माहिती सर्व ग्रामीण भागात पोहचवून त्याचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे,

(२) हे खरे नाही.

जिल्हा निहाय उद्दिष्ट ठरवून दिल्यानुसार वाटप करण्यात आलेले आहे.

(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा प्रसिध्दी वर्तमानपत्र, चित्ररथ, एस.टी. महामंडळाच्या बसेसवर, दुरदर्शन इत्यादीव्दारे व्यापक स्वरुपात करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील जिल्हा परिषद वार्षिक योजनांच्या कामासाठी मिळालेल्या निधीचे योग्य नियोजन करण्याबाबत**

**(२) ४३२२१ (३०-०५-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील जिल्हा परिषद वार्षिक योजनांच्या कामांची स्थिती अत्यंत विदारक असून फक्त २६.१४ टक्केच पैसे खर्च झाल्याने आता अडीच महिन्यात ७४ टक्के खर्च करण्याची जबाबदारी सर्वच विभागांवर आल्याने कामे अपेक्षित वेगाने होत नाही व त्यामुळे निधी परत जाण्याची शक्यता असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित निधीचे योग्य नियोजन न करणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-११-२०१९) :** (१) अशंत: खरे आहे.

(२) व (३) सन २०१५-१६ मध्ये ज्या कामांना निधी उपलब्ध झाला आहे, त्या कामांना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व तद्नंतरची निविदा यांस नियोजन करून मंजुरी घेण्याच्या प्रक्रीयेमध्ये काही प्रमाणात विलंब झाला असुन माहे जानेवारी २०१६ पावेतो विकास कामांवर २६% खर्च झालेला होता. मात्र तद्नंतर मार्च, २०१६ अखेर ४८% निधी खर्च झाला होता.

जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांनी उर्वरीत निधीचे नियोजन करून सर्व खर्च करण्याचे उद्दिष्ठ ठेवले होते. वित्त विभागाचे दि. ६/६/२००८ रोजीच्या शासन निर्णया नुसार माहे मार्च २०१७ पर्यंत निधी खर्च करण्यास शासनाची परवानगी असल्याने मार्च, २०१६ अखेरचा अखर्चित निधी परत जाण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाई (ता.मुदखेड, जि.नांदेड) या गावातील दलित वस्तीत बांधण्यात आलेल्या नाल्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(३) ५०७८३ (२८-०४-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाई (ता.मुदखेड, जि.नांदेड) या गावातील दलित वस्तीत नालीचे वाहत येणारे पाणी वस्तीत जाऊ नये यासाठी बांधण्यात येत असलेल्या नाला बांधणीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात आलेल्या टाकीच्या कामात गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा) तालुक्यात कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत समाजकल्याण विभागाच्या नावावर गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(४) ५५०१३ (२०-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत खामगाव तालुक्यातील (जि.बुलढाणा) मागासवर्गीय व इतर काही लोक या योजनेत जमिन विक्री करणाऱ्या मालकांकडून तसेच भूमिहिन लाभार्थ्यांकडून समाजकल्याण विभागाच्या नावावर खोटी माहिती देऊन त्यांचेकडून रोख रक्कम घेऊन त्यांची पिळवणूक करीत असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत जमीन मालक तसेच लाभार्थी यांची फसवणूक होऊ नये म्हणून सहायक आयुक्त, समाजकल्याण, बुलढाणा यांनी स्थानिक वर्तमानपत्रात लोकांनी जागृत रहावे या करीता स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निवेदन दिले आहे. योजनेची अंमलबजावणी अत्यंत पारदर्शक व खुल्या पध्दतीने करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हा अंतर्गत दलित वस्ती सुधार योजना व १३ व्या वित्त आयोगअंतर्गत कामाच्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता करुन कामे करण्यात आल्याबाबत**

**(५) ६३७७१ (२०-०८-२०१६). श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हा अंतर्गत ग्रा.पं.सिंदी (मेघे) (पं.स.वर्धा) येथे सन २०१५-१६ मधील दलित वस्ती सुधार योजना व १३ वा वित्त आयोग अंतर्गत कामाच्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता करुन कामे करण्यात आल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जि.प. स्थायी समिती सभेमध्ये तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वस्ती सुधार योजना कामाची ई-टेंडर की उघडल्यास ICDS विभागाची Site उघडल्या जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रा.पं.अंतर्गत उक्त वस्ती सुधार योजना कामाचा करारनामा जि.प.बांधकाम विभागाने दिनांक ३ ऑक्टोंबर, २०१५ रोजी करुन रुपये ९.०० रुपये किंमतीच्या रस्त्याचे काम दिनांक ८ ऑक्टोंबर, २०१५ रोजी पूर्ण करण्यात आले व कामाची ए.बी. दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी तयार करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कामे पुर्ण झाल्यानंतर दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी याच कामाचा करारनामा सदर ग्रा.पं ने रफीक कन्स्ट्रक्शन कंपनीशी केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त दोन्ही नियमबाह्य प्रकरणी संबंधित दोषीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

दि.२३.१२.२०१५ रोजी स्थायी समिती सर्वसाधारण तहकुब सभेमध्ये जिल्हा परिषद सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यामध्ये १३ वा वित्त आयोगाच्या कामाबाबतचा उल्लेख आढळून आला नाही.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा विकास योजनेच्या कामा ऐवजी आयसीडीएस साईटवर वाहन पुरवणे संदर्भातील निविदा दिसून येते सदर बाब ही तांत्रिक स्वरुपातील होती.

दि.१७.१०.२०१५ रोजी मे. एम.रफिक कन्स्ट्रक्शन कंपनी सोबत ग्रामपंचायत सिंदी (मे) यांनी करारनामा केलेला आहे.

(५) ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत सिंदी (मेघे) यांना चौकषी अंती निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

---

**मौजे रौंढ (ता.सालेकसा, जि.गोंदिया) येथील दलित वस्ती सुधार योजनेतून नवबौध्दांच्या शौचालयाच्या सुविधासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६) ७०९०३ (२७-०१-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रौंढ (ता.सालेकसा, जि.गोंदिया) येथील दलित वस्ती सुधार योजनेतून नवबौध्दांच्या शौचालयाच्या सुविधासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) व (२) दिनांक १८/१०/२०१६ चे निवेदन आढळून आले नाही. तथापि, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत मौजे रौंढ (ता.सालेकसा, जि.गोंदिया) या गावातील सिमेंट नाली बांधकामाबाबतचा प्रस्ताव गटविकास अधिकारी, सालेकसा यांचे पत्रासोबत दिनांक १४/२/२०१७ रोजी प्राप्त झाला असून सदर कामासाठी रु.५.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. शौचालयाच्या सुविधेसाठी प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सायन-पनवेल मार्गावरील (चेंबुर) परिसरात जुन्या वाहन विक्रेत्यांकडून अवैध पार्किंग होत असल्याबाबत

**(७) ७८२९४ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन-पनवेल मार्गावरील (चेंबुर) परिसरात जुन्या वाहनांची विक्री करणा-या माफियांनी फुटपाथ अडवून त्या ठिकाणी या विक्रीच्या वाहनांची अवैध पार्किंग सुरू केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फुटपाथ हस्तगत करून जुन्या वाहनांची अवैध पार्किंग करून वाहन विक्री करणा-याविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, यास अभय देणा-या संबंधित अधिका-यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१९) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील चेंबुर परिसरात सायन-पनवेल मार्गावरील गोल्डी मोटर्स, एक्झीक्युटीव्ह मोटर्स, ॲटो पार्ट मोटर्स या दुकानात जुन्या वाहनांची विक्री होत असते व सदर दुकानाचे मालक विक्रीच्या वाहनांची अवैध पार्किंग करीत असतात.
(२) व (३) अशाप्रकारे जुन्या वाहनांची अवैध पार्किंग करुन वाहन विक्री करणाऱ्या विरुध्द बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील वाहतुक शाखेच्या ट्राम्बे वाहतुक विभागाकडून सन-२०१७ ते २०१९ (दि.२५/०९/२०१९ पर्यंत) या कालावधीत Rule of the Road Regulation Act मधील कलम १५ सह मोटार वाहन कायद्यांतर्गत कलम १७७ अन्वये ६५१ वाहनांवर अवैध पार्किंग केल्या प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, चेंबूर परिसरात सन-२०१८ मध्ये जुन्या वाहनांची अवैध पार्किंग करुन वाहन विक्री करणाऱ्या दोन विक्रेत्यांविरुध्द संबंधित चेंबूर पोलीस ठाणेस गु.र.क्र.३०९/२०१८, कलम-२८३ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर दोन्ही आरोपीत वाहन विक्रेत्यांना मा.न्यायालयाने दंडाची शिक्षा ठोठावली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुस्लीम मेहतर सफाई कर्मचा-यांचा विकास करणेबाबत**

**(८) ७९४५१ (२१-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुस्लीम मेहतर सफाई कर्मचा-यांना शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी व त्यांचे उदरनिर्वाह होणे कामी अमंलबजावणी करणेबाबत दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दालन क्रमांक ३१६ मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजीत केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीमध्ये सफाई कामगारांच्या मुलांना वारसा हक्काप्रमाणे सफाई कामगार पदावर नोकरी देण्याबाबत मा.मंत्री समाजकल्याण यांनी आदेश दिला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) बैठकीच्या कार्यवृत्ताप्रमाणे तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोळंबी (ता.जि.अकोला) येथील दलित वस्ती अंतर्गत असलेल्या कामांच्या चौकशी अहवालाची प्रत मिळणेबाबत**

**(९) ८२३९६ (२१-०४-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोळंबी(ता.जि.अकोला)येथील दलित वस्ती अंतर्गत असलेल्या कामांच्या चौकशी अहवालाची प्रत माहितीसाठी सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अकोला यांना स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनात जनतेच्या मागणीनुसार डांबरीकरणाच्या कामाऐवजी सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम केल्याची तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू माहिती देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी असलेल्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
मा. विधानसभा सदस्य मुर्तीजापूर यांनी केलेल्या मागणीनुसार चौकशी अहवालाची प्रत देण्यात आली असून ग्रामपंचायत कोळंबी यांनी डांबरीकरण रोड ऐवजी सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे असा ठराव घेतला त्यानुषंगाने समाज कल्याण समिती जिल्हा परिषद अकोला यांनी दिलेल्या मंजूरी नुसार डांबरीकरण रोड ऐवजी सिमेंट कॉंक्रीट रस्ता असा बदल करण्यात आला आहे
(४) सदर प्रकरणी चौकशी होवून चौकशीत दोषी आढळलेल्या ग्रामसेविकेस निलंबित करण्यात आले होते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील मागासवर्गीय औद्योगिक संस्थामध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार**

**(१०) ९७३८९ (०६-०१-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील मागासवर्गीय औद्योगिक संस्थामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याप्रकरणी जिल्हयातील मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था बचाव कृती समितीतर्फे विविध मागण्याचे निवेदन समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर यांना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०१-०४-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) दोषी संस्थांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात दलित वस्ती सुधार योजनेसाठी निधी असतानाही**
**कामे सुरू न झाल्याने मंजूर कामे रद्द केल्याबाबत**

**(११) १०३७८९ (०६-०१-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात दलित वस्ती सुधार योजनेसाठी निधी असतानाही १५ वर्षात कामे सुरु न झाल्याने मंजूर ७७ कामे रद्द करण्याची वेळ जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागावर आल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच ग्रामपंचायतींना या कामांसाठी वितरित केलेला सुमारे २ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कारवाई केली आहे काय तसेच सदरहू कामे पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१८-१०-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे, सन २००६-०७ ते १६-१७ या वर्षांत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत नाशिक जिल्हयात मंजूर कामांपैकी ६३ कामे जागेअभावी, जागेचा वाद, स्थानिक अडचण व कांही ग्रामपंचायतीचे रुपांतर नगर परिषदेत झाल्याने रदद केलेली आहेत.
(२) हे खरे नाही,
(३) ते (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मागासवर्गीय समाजातील होतकरु मुलांच्या ४४९ औद्योगिक सहकारी संस्थांना मदत देण्यास विलंब लागत असल्याबाबत

**(१२) ११०७३३ (२०-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मागासवर्गीय समाजातील होतकरु मुलांना औद्योगिक संस्था स्थापन करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी निर्णय घेऊनही मागासवर्गीयांच्या ४४९ औद्योगिक सहकारी संस्थांना मदत देण्यास विलंब केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केलेली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बेरोजगारांनाकरिता औद्योगिक संस्था स्थापन करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) बार्टी या संस्थेमार्फत योजनेचे मुल्यमापन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्हाळगाव (ता.पवनी, जि.भडांरा) गावातील विकास कामाकरीता निधी हस्तांतरीत करणेबाबत**

**(१३) १२०९७९ (२६-०७-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्हाळगाव (ता.पवनी, जि.भडांरा) हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त निवडक गाव असून त्या गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सदर गावाला शासन निर्णय क्र. दवसु - २०१८/प्रक्र८४/अजाक दि. ३१ मार्च २०१८ अन्वये १ कोटी ३२ लक्ष ७ हजार २०० रुपयास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावातील विकासकामे करण्यासाठी सदर निधी सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर निधी महासंचालक, बार्टी यांचे मार्फत प्रादेशिक उपायुक्त, नागपूर यांचेकडे वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांकरीता कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना राबविण्याबाबत**

**(१४) १२५०१४ (०२-०८-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचे राहणीमान उंचाविण्यासह त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समाजातील दारिद्रय रेषेखालील आणि भूमिहीन शेतमजूर कुटुंबांना चार एकर जिरायती (कोरडवाहू) किंवा दोन एकर बागायती (ओलीताखालील) जमीन उपलब्ध करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात नागरीकांना जमिन उपलब्ध होत नसल्याने या योजनेची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याने या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी आतापर्यंत राज्यातील नागरीकांना जमीनी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने दिनांक १४/८/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मागासवर्गीय समाजातील भूमिहीनांना मोफत जमिनीसाठी काढण्यात आलेल्या शासन निर्णयातील अटी शिथिल करणेबाबत

**(१५) १२९६७७ (०६-१२-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती आणि नवबौध्द समाजातील दारिद्र रेषेखालील भूमिहीन कुटूंबांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत मोफत शेत जमीन देणारा शासन निर्णय जाहिर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहिर केलेल्या निर्णयात अत्यंत जाचक असलेल्या अटी व नियमावलीमुळे अनेक लाभार्थी वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली केली काय, चौकशीत काय आढळून त्यानुसार या निर्णयातील अटी सुटसुटीत करुन मागासवर्गीय लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देवगाव (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत दलित वस्तीचे काम करणेबाबत

**(१६) १२९८९३ (०४-१२-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील देवगाव ग्रामपंचायत मध्ये दलीत वस्ती सुधार योजनेमध्ये दलीत वस्तीतील रस्ते अपूर्ण असताना ७ PM बार हॉटेल ते उके सर यांच्या घरापर्यंत एकही दलीत लाभार्थी नसताना रस्त्याचे काम करण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची जागा बदलून रस्त्याचे काम चुकीच्या जागी केल्याने दलीत वस्तीतील नागरीकांवर अन्याय झाला असल्याने त्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दलीत वस्ती सुधार योजनेमध्ये अंतर्गत देवगाव (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील दलीत वस्तीत काम न करता इतरत्र रस्त्याचे काम केल्याने सदर कामाचे कोणतेही देयक अदा न करता दोषींवर कार्यवाही करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती धामंणगाव रेल्वे यांना दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह रस्त्याचे काम तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-१०-२०१९) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणाची चौकशी विस्तार अधिकारी पंचायत समिती धामणगांव रेल्वे यांचेमार्फत करण्यात आली असून सदर काम अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्येच झालेले असल्याचे चौकशी अहवालात नमूद केलेले असल्यामुळे कोणावरही कारवाई करण्यात आली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

### शाहुवाडी व पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कासारी नदीवरील गेलवडे मध्यम प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पाटबंधारे विभागातील सुरक्षा रक्षक व कालवा निरीक्षक पदे रिक्त असल्याबाबत

**(१७) १३४९१३ (०५-०७-२०१९). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी व पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कासारी नदीवरील गेलवडे मध्यम प्रकल्पांतर्गत कोल्हापूर पद्धतीचे १४ बंधारे असून सदर १४ बंधाऱ्याकरिता केवळ २ सुरक्षा रक्षक असून १४ सुरक्षा रक्षकांची पदे रिक्त आहेत तसेच ७ कालवा निरीक्षक पदे कार्यरत असून ११ निरीक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे पाणी पट्टी वसुलीवर व धरणाच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कासारी नदीवरील गेलवडे मध्यम प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पाटबंधारे विभागाच्या सुरक्षा रक्षक व कालवा निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) कार्यरत कर्मचाऱ्यांकडून तसेच अन्य शाखेकडून सेवा वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांकडून पाणीपट्टी वसुली व देखभालीचे काम केले जात असल्याने पाणीपट्टी वसूलीवर परिणाम झालेला नाही व धरण देखभालीवर दुर्लक्ष होत नाही.
(३) व (४) शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २ जून, २०१५ अन्वये सरळसेवा भरतीवर निर्बंध घालण्यात आले असून शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २५ मे, २०१७ अन्वये विभागाचा आकृतीबंध सुधारीत झाल्याशिवाय पदभरती करण्यास देखील निर्बंध आहेत. सद्यस्थितीत जलसंपदा विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगती पथावर आहे. त्यानुसार विभागाच्या आकृतीबंधास अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

---

### शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) १३५०४८ (०१-०७-२०१९). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुका हा अतिशय दुर्गम व डोंगराळ तालुका असून या तालुक्यात एकूण १३१ महसुली गावे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्यासाठी तलाठ्यांची ३९ पदे मंजूर असून त्यापैकी केवळ २९ पदावरच तलाठी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या रिक्त असलेल्या पदांमुळे प्रत्येक तलाठ्याला अतिरिक्त गावांचा कार्यभार सांभाळावा लागत असल्याने या गावांमध्ये तलाठी वेळेवर हजर राहत नसल्याने शेतकऱ्यांची अनेक कामे खोळंबली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून शाहुवाडी तालुक्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१९) :** (१) होय.
(२) शाहुवाडी तालुक्यामध्ये तलाठ्यांची एकूण ३९ पदे मंजूर असून त्यापैकी ३० पदांवर तलाठी कार्यरत आहेत.
(३) रिक्त असलेल्या ९ सजांचा अतिरीक्त कार्यभार अन्य तलाठी यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांची कामे खोळंबल्याबद्दल अथवा सजांच्या गावांमधील कामकाजाबाबत कोणतीही तक्रार तहसिलदार शाहुवाडी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) सन २०१९ च्या महापदभरतीन्वये कोल्हापूर जिल्ह्यातील तलाठी संवर्गाच्या एकूण ६७ रिक्त पदांची भरती प्रक्रियेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

---

### वांद्रे (मुंबई) येथील कामगार आयुक्त कार्यालयासमोर घरेलु कामगारांनी केलेले आंदोलन

**(१९) १३५५५९ (१५-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील कामगार आयुक्त कार्यालयासमोर घरेलु कामगारांनी आंदोलन केले असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी (पेन्शनसाठी) सरकार, मालक व कामगार यांचे त्रिपक्षीय बोर्ड स्थापन करावे या मागणीसह अन्य मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (०१-११-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे

(३) घरेलू कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य शासन पुरस्कृत विमा योजना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खडकवासला प्रकल्पातून (जि.पुणे) उन्हाळी पिकांसाठी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्यासाठी पाणी देण्याच्या निर्णयाबाबत

**(२०) १३६५८६ (०५-०७-२०१९). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला प्रकल्पातून (जि.पुणे) यंदा उन्हाळी पिकांसाठी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्यासाठी केवळ २.६८ अब्ज घनफूट पाणी देण्याचा निर्णय कालवा समितीच्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी प्रमाणे उन्हाळी पिकांसाठी सुमारे पाच टीएमसीऐवजी आता निम्मेच पाणी उन्हाळी पिकांना मिळणार असल्याने पिकांचे नुकसान होणार आहे तसेच पिण्याच्या पाण्याचा तुटवडा निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अशंत: खरे आहे. खडकवासला प्रकल्पाच्या नवा मुठा उजवा कालव्याच्या एका उन्हाळी आवतनासाठी सर्वसाधारणपणे ५ टीएमसी पाण्याची आवश्यकता असते. तथापि, उन्हाळी हंगाम २०१९ करीता २.६८ टीएमसी पाणी उपलब्ध राहिलेले पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आल्यामुळे दौंड नगरपालिका व ग्रामीण भागातील कालव्यावर अवलंबून असलेल्या ग्रामपंचायतींना पिण्याचे पाणी देण्यात आलेले आहे.
(३) पुणे महानगरपालिकेचा पाणीवापर महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मापदंडाच्या मर्यादेत करण्यासाठी जलसंपदा विभागाने महानगरपालिकेस सुचना दिलेल्या आहेत. खडकवासला जलाशयातून पाणी उपसा करण्यासाठीचे ३ पंप हाऊन अनु.वारजे-१, वारजे-२ व नवीन पंप हाऊस तसेच ग्रॅव्हिटी पाईप लाईन इ. चा ताबा पुणे महागनरपालिकेकडे असल्यामुळे त्यावर प्रत्यक्ष नियत्रंण करणे जलसंपदा विभागस शक्य झाले नाही.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाच्या मर्यादेत पाणी वापर कमी करण्याची जबाबदारी पुणे महानगरपालिकेची आहे. तसेच, पुणे महानगरपालिकेच्या वाढीव पाणी वापरावर महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने दि.१७.१२.२०१८ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द महानगरपालिकेने मुंबई उच्च न्यायालयात अपिल दाखल कलेले असल्याने सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) गावाचा 'मुख्यमंत्री ग्रामीण सांडपाणी प्रक्रिया व्यस्थापन प्रकल्प' योजनेमध्ये समावेश करण्याबाबत**

**(२१) १३६७१५ (११-०७-२०१९). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) या गावाचा 'मुख्यमंत्री ग्रामीण सांडपाणी प्रक्रिया व्यस्थापन प्रकल्प' योजनेमध्ये समावेश करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १० एप्रिल, २०१८ व दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-११-२०१९) :** (१) होय, खरे आहे.

(२) ग्रामीण भागातील सांडपाणी प्रक्रीया व्यवस्थापनासाठी राज्याची अद्याप स्वतंत्र योजना नाही.

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजनेतंर्गत ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या अनुषंगाने, शासन निर्णय दिनांक २१/०८/२०१३ (आता दिनांक १९/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित) शासन पत्र दिनांक ०५/०३/२०१९ व शासन निर्णय दिनांक १९/०७/२०१९ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाकरीता स्वच्छ भारत अभियान (ग्रामिण) या योजनेंतर्गत ग्रामपंचायतीमधील कुटुंब संख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद असून, शासन निर्णय दिनांक १९/०७/२०१९ अन्वये ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनेबाबत सर्व जिल्हा परिषदांना निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका आयुक्त यांनी बेकायदेशीर पदोन्नती दिल्याबाबत**

**(२२) १३६७५८ (१३-०७-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका आयुक्त यांनी बेकायदेशीर पदोन्नती दिलेल्या सर्व अधिकाऱ्यांविरुध्द तातडीने कारवाई करण्याचे शासनाने निर्देश देऊनही अद्याप त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.शिवमुर्ती नाईक व श्री.अच्युत हांगे यांना पदोन्नती बेकायदेशीरपणे देणाऱ्या तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांचेविरोधात कोणतीही कारवाई शासनाने न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ज्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदोन्नती बेकायदेशीरपणे करण्यात आली होती त्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर शासकीय नियमाप्रमाणे मिळालेला आर्थिक लाभ बेकायदेशीर असून त्याची वसुली शासनाने अद्याप केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने निर्देश देऊनही अद्याप वसुली न करण्याची कारणे काय आहेत तसेच वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१९) :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती गैरप्रकारासंदर्भात शासनपत्र दिनांक २४.१०.२०१६ अन्वये महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत कळविण्यात आले होते.

तद्नुषंगाने महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील संबंधित अपचारी कर्मचारी यांची भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका स्तरावर विभागीय चौकशी सुरु आहे.
(२) सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासन स्तरावर दोषारोप पत्र बजावण्यात आले असून विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.
(३), (४) व (५) ज्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीविरुध्द आक्षेप होते अशा संबंधित कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात आले आहे.

तसेच पदोन्नतीचे आर्थिक लाभाची वसूली करण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**मुंबई उपनगरीय रेल्वेच्या सुरक्षेसाठी पोलीसांची संख्या वाढविण्याबाबत**

**(२३) १३६९८३ (१३-०७-२०१९). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरीय रेल्वेमधील प्रवासी संख्या सुमारे ८० लाखांवर पोहोचली असताना त्यांच्या सुरक्षेसाठी केवळ चार हजार रेल्वे पोलीस असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वे स्थानकांवरील उद्घाटनाचे कार्यक्रम, बंदोबस्त, निवडणुकांचा बंदोबस्त, रेल रोको आंदोलन यामुळे प्रवाशांची सुरक्षा हे मुख्य काम करताना पोलीसांवर अतिरिक्त ताण पडत असुन प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पोलीससंख्या बळ कमी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी रेल्वे पोलीस संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१९) :** (१) मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाची मंजूर पोलीस कर्मचारी संख्या ३७८० इतकी असून मे-२०१९ मध्ये एकूण हजर संख्या ३५१० इतकी आहे.
(२) व (३) पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांनी प्रवाशांच्या दृष्टीने मुंबई लोहमार्ग पोलीसांच्या मदतीला गृह विभाग, शासन निर्णय दि.०९.०८.२००४ अन्वये ५०० होमगार्ड, गृह विभाग, शासन निर्णय दि.२२.०२.२०१४ अन्वये १५०० होमगार्ड, व गृह विभाग, शासन निर्णय दि.१५.०३.२०१७ अन्वये मध्ये महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे २०० कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत आदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोयना जलविद्‌यूत प्रकल्पातंर्गत पुनर्वसित गावठाणांमधील करावयाच्या नागरी सुविधांच्या कामांबाबत

**(२४) १३७१६४ (११-०७-२०१९). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना जलविद्‌यूत प्रकल्पातंर्गत पुनर्वसित गावठाणांमधील करावयाच्या नागरी सुविधांची कामे ही कोयना पुनर्वसन उपविभाग क्रं.२ सातारा बांधकाम यांचे अखत्यारित कार्यकारी अभियंता कोयना धरण व्यवस्थापन विभाग कोयनानगर यांचेमार्फत करण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ मे,२०१७ च्या शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागीय कार्यालयाच्या फेररचनेमध्ये शासन निर्णयाच्या पृष्ठ क्रं.१० वरील मुद्दा क्रं.०६ नुसार कोयना जलविद्‌यूत प्रकल्पातंर्गत पुनर्वसित गावठाणां मधील करावयाच्या नागरी सुविधांची कामे ही कोयना पुनर्वसन उपविभाग क्रं.२ सातारा बांधकाम यांचे अखत्यारित कार्यकारी अभियंता कोयना धरण व्यवस्थापन विभाग कोयनानगर यांचेकडून काढून घेवून ती कार्यकारी अभियंता कण्हेर कालवे विभाग क्रं.२ करवडी कराड या कार्यालयाकडे देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यकारी अभियंता कण्हेर कालवे विभाग क्रं.२ करवडी कराड हे कार्यालय पुर्नवसित गावठाणांपासून सुमारे ५० ते ५५ किलोमीटर लांब असल्याने पाटण तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमधील नागरिकांना त्यांच्या मुलभूत सुविधांची कामे करुन घेण्याकरीता अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १ मार्च,२०१८ च्या शासन निर्णयानुसार शासनाचे महसूल व वन विभागाने कोयना जलविद्‌यूत प्रकल्पातंर्गत पुनर्वसित गावठाणांमधील करावयाची नागरी सुविधांची कामे ही मोठया प्रमाणात मंजुर केली असून सदरची कामे हाती घेण्यामध्ये कार्यकारी अभियंता कण्हेर कालवे विभाग क्रं.२ करवडी कराड या कार्यालयास अनेक अडचणी निर्माण होत असल्याने सदरची कामे पुर्ववत कोयना पुनर्वसन उपविभाग क्रं.२ सातारा बांधकाम यांचे अखत्यारित कार्यकारी अभियंता कोयना धरण व्यवस्थापन विभाग कोयनानगर यांच्या कार्यालयाकडे देण्यात यावी याकरीता मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक ३ जुलै,२०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-१०-२०१९) :** (१) होय.

(२) होय. शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र.आढावा २०१७/प्र.क्र.१/२०१७(आ)/प्रशि, दि.१२.०५.२०१७ अन्वये सिंचन व्यवस्थापनासाठी फेररचना करताना पाटण तालुक्यातील पुनर्वसित गावठाणामधील नागरी सुविधांची कामे ही कार्यकारी अभियंता, कण्हेर कालवे विभाग क्र.२, करवडी (कराड) या विभागाकडे वर्ग करण्यात आली आहेत.

(३) व (४) या संदर्भात मा. लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे.

(५) सदर बाब शासनाच्या विचाराधिन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) येथील भाटघर या धरणातील आवर्तन थांबविण्याबाबत**

**(२५) १३७२५७ (१०-०७-२०१९). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) येथील भाटघर या धरणात केवळ २ टीएमसी एवढा पाणीसाठा उपलब्ध असून माहे जुलै अखेर प्रस्तुत पिण्याच्या पाण्याच्या योजना अखंडित चालू राहण्याकरिता आवर्तन थांबविणे आवश्यक असतानाही अदयापही आवर्तन थांबविले नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाटघर व निरा देवधर धरणातील पाणी नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित ठेवणे आवश्यक आहे याकरिता सदरहू उक्त धरणामधून आजही पॉवर हाऊसमधुन १७०० क्युसेक्सने पाण्याचे आवर्तन सुरु असून या धरणातून भोर शहर व जवळपास ५०-६० गावांना पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यरत असल्याने या आर्वतनामुळे पिण्याच्या पाणीवाटपावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-१०-२०१९) :** (१) हे, खरे नाही
(२) हे, खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयास परवानगी देण्याबाबत**

**(२६) १३७३६५ (०९-०७-२०१९). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाग झालेले वैद्यकीय अभ्यासक्रम आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील कमी रोजगार यामुळे विद्यार्थ्याचा मोठा गट औषध निर्माण शास्त्र अभ्यासक्रम यामध्ये प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षापासून या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे या अभ्यासक्रमासाठी अर्ज केलेल्या ४० महाविद्यालयांना परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-११-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता अद्यापपर्यंत राज्यातील औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) पदविका अभ्यासक्रमाच्या ३७ नवीन संस्थांना शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

याबाबत शासन निर्णय दि. २०/०६/२०१९ अन्वये -२५, दि. २५/०६/१९ अन्वये -९, दि.२५/०६/१९ अन्वये-२, दि. ४/०७/१९ अन्वये -१ व दि.८/०७/१९ अन्वये-१ अशा एकुण ३८ नवीन औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांना मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, दि.२०/०६/१९ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या संस्थांपैकी एका संस्थेचे नाव दि.२५/०७/१९ रोजीचे शासन शुद्धीपत्रकान्वये वगळण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रतापनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील (नागपूर शहर) अपार्टमेंटमध्ये**
**अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(२७) १३७३७१ (१३-०७-२०१९). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील प्रतापनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रिंग रोड परिसरात एका अपार्टमेंटमध्ये हायप्रोफाईल सेक्स रॅकेट सुरू असल्याची माहिती पोलीसांना मिळताच त्यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास त्या अपार्टमेंटमध्ये धाड टाकून नाममात्र कारवाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस विभागाने एवढी मोठी कारवाई करून सुध्दा पोलीस ठाण्यात या प्रकरणाची कुठेही नोंद नसल्याने हे प्रकरण आर्थिक देवाणघेवाणातून दडपण्यात आले असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित अधिकारी, कर्मचारी व इतर दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१९) :** (१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत प्रतापनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशा प्रकारची प्रकारची घटना घडल्याची रेकॉर्डवर कुठलीही नोंद नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मुद्दा क्र.१ मधील धाडीबाबत प्रतापनगर पोलीस ठाण्यातील रेकॉर्डवर कुठलीही नोंद नसल्याने दोषींवर कारवाई करण्यात आलेली नाही

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात १२ लाख बोगस शिधापत्रिका रद्द करण्यात आल्याबाबत**

**(२८) १३७३८० (०७-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १२ लाख बोगस शिधापत्रिका रद्द करण्यात आल्याचा प्रकार माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, बोगस शिधापत्रिका धारकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१६-१०-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) राज्यात राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांची माहिती पीडीएस डाटाबेसमध्ये सामाविष्ट करण्यात येत आहे.त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत १४८.३८ लक्ष पात्र शिधापत्रिकांपैकी १४२.५८ लक्ष तसेच दुष्काळग्रस्त जिल्हातील दारिद्रयरेषेवरील ७.५२ लक्ष शेतकरी शिधापत्रिकांपैकी ६.९८ लक्ष शिधापत्रिकांचे आधार सिडींग पूर्ण करण्यात आले आहे. डाटा डिजीटायजेशन केल्यामुळे सुमारे १० लक्ष शिधापत्रिका दुबार, मयत व प्रत्यक्ष गृहभेटीद्वारे अपात्र ठरल्याने वगळण्यात आलेल्या असून उर्वरित लाभार्थ्यांचे माहितीचे संगणकीकरण करण्याची व त्यानुषंगाने अपात्र शिधापत्रिका वगळण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय अनुदानित आश्रमशाळांना अन्न व नागरीपुरवठा विभागाकडून होणारा रेशनिंग धान्यपुरवठा बंद करण्यात आल्याबाबत**

**(२९) १३७४९३ (१०-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय अनुदानित आश्रमशाळांना अन्न व नागरीपुरवठा विभागाकडून होणारा रेशनिंग धान्यपुरवठा बंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शाळा व्यवस्थापनाला बाजारातून अधिक दराने धान्य विकत घ्यावे लागत असल्याने शासकीय अनुदानित आश्रमशाळांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१६-१०-२०१९) :** (१), (२) व (३) कल्याणकारी संस्था व वसतिगृहे यांना अन्नधान्य पुरवठा ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाने दिनांक १९.०३.२०१९ च्या पत्रान्वये सदर योजनेंतर्गत फक्त शासनाच्या मालकीचे/शासन चालवित असलेल्या संस्थानाच नियतन वितरित करण्यात येईल असे सर्व राज्यांना कळविले आहे.

त्यानुसार केंद्र शासनाकडून कल्याणकारी संस्था व वसतिगृहे योजनेंतर्गत माहे एप्रिल ते सप्टेंबर २०१९ या सहामाही कालावधी साठी फक्त शासनाच्या मालकीचे/शासन चालवित असलेल्या संस्थासाठी अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर अन्नधान्याचे जिल्हांनिहाय नियतन दिनांक ८ ऑगस्ट २०१९ च्या आदेशान्वये करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) तालुक्यातील मोरणा, उत्तरमांड, तारळी व वांग खोऱ्यामध्ये मध्यम स्वरूपाच्या नद्यांवर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधण्यास निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३०) १३७५२१ (११-०७-२०१९). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील मोरणा,उत्तरमांड.तारळी व वांग खोऱ्यामध्ये मध्यम स्वरूपाच्या नद्या कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यात या नद्यांना येणारे पाणी हे अडविण्याकरीता कोणतेही साधन नसल्याने नद्यांचे पावसाळ्यातील पाणी वाहून जाते व पुढील आठ महिने या गावातील लोकांना शेतीसाठी विहिरींच्या पाण्याचा वापर करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोरणा, उत्तरमांड, तारळी व वांग खोऱ्यामध्ये माध्यम स्वरूपाच्या नद्यांवर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधण्यास सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध करून देण्याबाबत मा.राज्यमंत्री जलसंपदा यांना दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०९-२०१९) :** (१) होय.

(२) नाही. मोरणा, उत्तरमांड, तारळी व वांग खो-यामधील नद्यांवर तारळी हे मोठे धरण तसेच मोरणा व उत्तरमांड ही मध्यम धरणाची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. या धरणामध्ये पाणीसाठा होत आहे. वांग मध्यम प्रकल्पाच्या धरणाचे काम प्रगतीपथावर आहे

(३) होय.

(४) तारळी, वांग व मोरणा गुरेघर या प्रकल्पांसाठी शासनाने खालीलप्रमाणे निधी उपलब्ध केला आहे.

**( रु. कोटीत )**

| प्रकल्प | सन २०१७-१८ | सन २०१८-१९ | सन २०१९-२० |
|---|---|---|---|
| तारळी | ६१.९० | ११४.८० | ९५.०० |
| वांग | ५४.४२ | ८५.३६ | २०.०० |
| मोरणा | २९.६६ | ३०.०० | २५.०० |

दिनांक २४.१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेल्या नवीन कोल्हापूर पध्दतीचे बंधा-यापैकी अ.क्र.१ खळे येथे वांग नदीवर वांग मध्यम प्रकल्पांतर्गत कोल्हापूर पध्दतीचे बंधारेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच अ.क्र. ५-काळगांव, ता.पाटण येथील साखरी नाल्यावर १ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पुर्ण व १ को.प. बंधारा प्रगतीत व इतर २ प्रस्तावित आहेत. अ.क्र.७-माजगाव ता.पाटण येथे उत्तरमांड नदीवर उत्तरमांड प्रकल्पांतर्गत माजगाव-१, माजगाव-२ व माजगाव-३ हे कोल्हापूर बंधारे पुर्ण करण्यात आलेले आहे. कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार कृष्णा खो-यातील पाणी वापराचा बृहत आराखडा महाराष्ट्र शासनाने दि.२०.१०.२००१ च्या पत्रान्वये केंद्रीय जल आयोगास सादर केलेला असून त्यामधील तरतुदीनुसार ५९९ टिएमसी पाणी वापराचे नियोजन पुर्ण झालेले आहे. उर्वरित मागणी केलेले बंधारे महाराष्ट्र कृष्णा खारे विकास महामंडळ, पुणे यांच्या प्रकल्पामध्ये समाविष्ठ नाहीत. तसेच, मा.विधानसभा सदस्यांच्या दिनांक २४.१.२०१७ च्या पत्रामध्ये उल्लेख केलेल्या कामांपैकी उत्तरामांड नदीवर जलसंधारण विभागामार्फत मौजे खराडवाडी ता.पाटण येथील दोन को.प. बंधारे खराडवाडी क्र.१ व खराडवाडी क्र.२ हे जिल्हा नियोजन आराखडा सन २०१९-२० मध्ये प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे तारळे (जि.सातारा) येथील जाधवआळी तारळे मतदान केंद्रावरील केंद्रप्रतिनिधी यांना अतिरिक्त पोलीस अधिक्षक, सातारा यांनी केलेली मारहाण

**(३१) १३७६२६ (१३-०७-२०१९). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) विधानसभा मतदारसंघात लोकसभेच्या निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास मौजे तारळे येथील १२५, जाधवआळी तारळे मतदान केंद्रावरील मतदान केंद्र प्रतिनिधी श्री.अभिजित पाटील या पदाधिकाऱ्यास

सातारा अतिरिक्त पोलीस अधिक्षक यांचे पथकाने व स्वत: अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री.धीरज शंकरराव पाटील यांनी कोणतेही कारण न देता किंवा पदाधिकाऱ्यांने कोणताही गुन्हा केला नसताना उपस्थित असलेल्या मतदारांपुढे व इतर व्यक्तींच्या समक्ष अमानुषपणे मारहाण केली असल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री.धीरज शंकरराव पाटील यांनी मारहाण केल्यानंतर अभिजीत पाटील या पदाधिकाऱ्यास तारळे पोलीस स्टेशनमध्ये विनाकारण सुमारे चार तास कोणतेही कारण न देता बसवून ठेवले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरम्यान यासर्व प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेवर तसेच या विभागातील मतदानावर याचा मोठ्या प्रमाणांत दुष्परीणाम झाला व समाजामध्ये चांगली प्रतिमा असणाऱ्या श्री.अभिजीत पाटील या पदाधिकाऱ्याची प्रतिमा मलीन करण्याचा अतिरिक्त पोलीस अधीक्षक, सातारा यांनी जाणिवपूर्वक प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास या प्रकारामुळे अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांचे विरुध्द येथील समाजामध्ये असंतोष निर्माण झाला असून त्यांचे विरोधात आंदोलने करण्याची भूमिका या विभागातील जनतेने घेतली असून आपल्या पदाचा गैरवापर करुन विनाकारण मतदानाच्या दिवशी काहीही कारण नसताना जनमाणसांत चांगली प्रतिमा असणाऱ्या पदाधिकाऱ्यास अतिरिक्त पोलीस अधिक्षक श्री.धीरज शंकराराव पाटील यांनी केलेल्या मारहाणीची उच्चस्तरीय चौकशी करुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी या विभागातील सर्वसामान्य जनता व पदाधिकारी यांच्यावतीने पोलीस महासंचालक, जिल्हाधिकारी सातारा व जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडे दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास आपल्या पदाचा गैरवापर करुन एका पक्षाच्या पदाधिकाऱ्यास मारहाण करणाऱ्या अतिरिक्त पोलीस अधिक्षक, सातारा यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे नाही,

अपर पोलीस अधीक्षक, सातारा श्री. धीरज शंकरराव पाटील हे मतदान केंद्र क्र. १२५ येथे दिनांक २३.०४.२०१९ रोजी गेले असता श्री. अभिजीत पाटील हे मतदान केंद्राच्या आवारात १०० मीटरच्या आत मोबाईल फोनवर बोलताना आढळून आले होते. याबाबत त्यांना मोबाईल फोन बंद करण्याबाबत सुचना देवुनही ते पोलीसांचे त्याचप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या आदेशाचेही पालन करीत नसल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पोलीस अधिकारी यांनी पोलीस वाहनात बसवुन तारळे येथील पोलीस चौकीत नेले होते. त्यानंतर अभिजीत पाटील व त्यांचे सोबत ताब्यात घेतलेले इतर ४ असे एकुण ५ लोकांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम ६८/६९ प्रमाणे दि. २३.०४.२०१९ रोजी ०९.१५ ते १३.०० च्या दरम्यान ताब्यात घेवुन त्यांच्यावर रितसर व कायदेशीर कारवाई करण्यात आल्याची नोंद उंब्रज पोलीस ठाण्याच्या स्टेशन डायरीमध्ये त्याच वेळी घेतली आहे. तसेच कलम ६९ प्रमाणे

मुक्त केल्याबाबत फ़ोनद्वारे कळविल्याबाबतच्या नोंदी उंब्रज पोलीस ठाणे दैनंदिनी मध्ये घेतलेल्या आहेत. श्री. अभिजीत पाटील यांच्यावर केलेली कारवाई रितसर व कायदेशीर मार्गाने असल्यामुळे त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा कोणताही जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला नाही. सदर मतदान केंद्रावर मतदान शांततेत व निर्भयपणे पार पडलेले आहे. आणि कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही.

(४) व (५) मा.विधानसभा सदस्य श्री. शंभुराजे देसाई, पाटण यांनी दि. २४.०४.२०१९ रोजी पत्राद्वारे सदर प्रकरणाबाबत उच्च स्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. या पत्राच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, सातारा यांच्याद्वारे सदर प्रकरणाची अधिकची चौकशी सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाचे विविध विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयामध्ये श्रेणीनिहाय प्रवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(३२) १३८२४८ (११-०७-२०१९). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाचे विविध विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयामध्ये श्रेणीनिहाय प्रवर्गातील किती पदे रिक्त आहेत,

(२) असल्यास, रिक्त पदांपैकी ७० टक्के पदे बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दीतीने भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या विविध पदांसाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव व वयोमर्यादा याचे स्वरुप काय ठरविण्यात आले आहे, तसेच रिक्त पदांचा सुधारित आकृतीबंद तयार करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-१०-२०१९) :** (१) माहे डिसेंबर, २०१७ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासनाचे विविध विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील एकूण ६,९८,३६३ पदांपैकी अंदाजे १,३९,१४३ पदे रिक्त होती.

(२) होय, प्रशासकीय विभागांना जुन्या आकृतिबंधानुसार मंजुर असलेल्या पदांपैकी रिक्त असलेल्या पदांच्या ७० टक्के मर्यादेत पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास, तसेच विवक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यास फक्त एक वर्षाच्या कालावधीसाठी वित्त विभागाच्या दि.११.१२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मुभा देण्यात आली आहे.

(३) व (४) वित्त विभाग शासन परिपत्रक दि.२७.०९.२०१०, दि.०२.०२.२०१३, दि.०२.१२.२०१३ व दि.०२.०८.२०१६ अन्वये कंत्राटी पद्धतीने कामे करण्याऐवजी बाह्ययंत्रणेद्वारे कामे करवून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्यासाठी कार्यपद्धतीही स्पष्ट करण्यात आली आहे. तथापि अशा सेवा घेण्यासाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव व वयोमर्यादा इत्यादीबाबत स्वतंत्र निकष विहित केलेले नाहीत.

तसेच सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या (खुद्द) व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांच्या आस्थापनेवरील सर्व मंजूर पदांचा आढावा घेऊन तद्संबंधीच्या सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक ठरविण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांचे सुधारीत आकृतिबंधाचे प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार आतापर्यंत ५ मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व ३४ क्षेत्रीय कार्यालयांच्या सुधारीत आकृतिबंधाच्या प्रस्तावांना उच्चस्तरीय सचिव समितीने अंतिम मंजुरी दिली आहे.

---

**पोलादपूर (जि.रायगड) सार्वजनिक बांधकाम उपविभाग बंद होणार असल्याबाबत**

**(३३) १३८६१६ (०५-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यात १२-१३ वर्षापूर्वी अस्तित्वात आलेल्या पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडे विकासकामांची कमतरता असल्याने सदर उपविभाग बंद करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपविभाग बंद करून महाड विभागाकडे वर्ग करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उपविभागाकडे विकास कामे न येण्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, सदर उप विभागासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०९-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

पोलादपुर तालुक्यातील रस्ते तसेच शासनाच्या विविध योजनेमधील कामे पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उप विभागामार्फत करण्यात येतात. यामध्ये शासकीय विश्रामगृह व चौकीदार निवासस्थान,सा.बा.उपविभागीय कार्यालय, शासकीय कर्मचारी निवासस्थाने, तालुका पोलीस मुख्यालय, पोलीस कर्मचारी निवासस्थाने इत्यादिंची देखभाल व दुरुस्ती यांचा समावेश आहे.

सद्य:स्थितीत पोलादपूर तालुका मुख्यालयातील शासकीय इमारती तसेच १७२.९० कि.मी. इतकी रस्ते लांबी पोलादपूर सा.बां. उपविभागाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३४) १३८६७६ (११-०७-२०१९). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात सहाय्यक कामगार अधिकारी, शॉप ॲक्ट निरिक्षक, लिपीक, शिपाई अशी १४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इचलकरंजी येथे ५ औद्योगिक वसाहती असल्यामुळे कामगारांची संख्या मोठी असून सतत निरनिराळी आंदोलने, मोर्चा, बंद, सुरु असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इचलकरंजी हे औद्योगिक शहर असल्यामुळे कामगार विषयक लवाद आणि सतत औद्योगिक अशांतता निर्माण होत असल्यामुळे सदर कार्यालयाचे कामकाज रिक्त पदांमुळे मोठ्या प्रमाणात दिरंगाई व अनियमितता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कार्यालयातील पदे रिक्त असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदरील पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (३१-१०-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

सहायक कामगार आयुक्त कार्यालय,इचलकरंजी येथे ९ पदे कार्यरत असून १२ पदे रिक्त आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सरकारी कामगार अधिकारी या संवर्गाची २ मंजूर पदे आहेत. त्यापैकी एक अधिकारी दि.१/६/२०१९ रोजी नियतवयोमानानूसार सेवानिवृत्त झाल्याने सदर पद दि.१/६/२०१९ पासून रिक्त आहे.

सद्यस्थितीत गट क व ड च्या सरळसेवेने भरण्यात येणा-या पदभरतीवर निर्बंध असल्याने सरळसेवेने पदे भरता येत नाहीत. तथापि पदोन्नती कोट्यातुन पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. तसेच गट-ड संवर्गातील २५ टक्के पदे निरसित करण्याचे वित्त विभागाचे आदेश असल्याने सदर पदे भरणे शक्य झालेले नाही.

रिक्त पदांचा कार्यभार अन्य अधिका-याकडे अतिरिक्त स्वरूपात सोपविण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील मौजे जेऊर व मौजे जिंती येथे नविन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत

**(३५) १३९२२७ (११-०७-२०१९). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील मौजे जेऊर व मौजे जिंती येथील पोलीस दुरक्षेत्राचे रुपांतर पोलीस ठाण्यामध्ये करुन तेथे पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत मा.राज्यमंत्री, गृह यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत गृह विभागाच्या अधिकाऱ्यांना स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याचे निर्देश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे जिंती हे पोलीस दुरक्षेत्र रेल्वेच्या रेड झोनमध्ये येत असल्याने मा.गृह राज्यमंत्री यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास खासबाब म्हणून पोलीस ठाणे मंजूर करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने मौजे जेऊर व मौजे जिंती येथे पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत पुढे कोणती निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१९) :** (१), (२) व (३) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील मौजे जेऊर व मौजे जिंती येथील पोलीस दुरक्षेत्राचे रुपांतर पोलीस ठाण्यामध्ये करुन तेथे पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे अध्यक्षतेखाली दि.०९.०७.२०१९ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत पोलीस दूरक्षेत्र, जेऊर यांचे पोलीस ठाण्यामध्ये रूपांतर करण्याबाबत नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास निदेश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने पोलीस दूरक्षेत्र, जेऊर चे पोलीस ठाण्यामध्ये रूपांतर करण्याबाबतचा नवीन परिपुर्ण प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे कार्यालय स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील सिडको महामंडळाच्या प्रशासकीय कार्यालयात बनावट कागदपत्रांद्वारे सुरक्षा रक्षकांची भरती करण्यात आल्याबाबत**

**(३६) १३९२५० (१३-०७-२०१९). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिडको महामंडळाच्या प्रशासकीय कार्यालयात मागील १५ वर्षापासून सुरक्षा रक्षक म्हणुन सेवा बजाविणा-यांना डावलून बनावट कागदपत्रांच्या आधारे सुरक्षा रक्षकांची भरती प्रक्रीया राबविण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षा रक्षक भरतीसाठी पुर्वी सेवा बजाविलेले आणि सीआयएसएस सुरक्षा रक्षक एजन्सीचा अनुभव आवश्यक असतांना निकष डावलून बनावट कागदपत्रांच्या आधारे दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजी वा त्यासुमारास सुरक्षा रक्षक भरती करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे सदर भरती प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचेकडे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१९) :** (१), (२), (३) व (४) सिडको महामंडळाच्या नाशिक येथील प्रशासकीय कार्यालयात करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षक भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२०.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये उच्च स्तरीय चौकशी करण्याची मागणी केली होती. सबब, सदर प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्याकरीता मुख्य प्रशासक (नविन शहरे), सिडको नवीन शहरे यांनी दि.२३.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये उच्च स्तरीय समिती गठित केली आहे. सदर चौकशी समितीच्या अहवालाअंती पुढील कार्यवाही करण्याची बाब नियोजीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील टेंभू प्रकल्प पूर्ण करण्यास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) १३९२८६ (०८-०७-२०१९). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २० डिसेंबर, २०१८ रोजी राज्य मंत्रिमंडळाने टेंभू उपसा सिंचन योजनेच्या ४०८८ कोटीस सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून या प्रकल्पास केंद्र सरकारच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेमार्फत सर्व प्रकल्पाची कामे माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने १२०३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे,हे खरे आहे काय,
(२) तसेच सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षामध्ये केंद्र व राज्य शासनाने प्रत्येकी किती रकमेची तरतूद केली आहे व वरील प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकावर सोपवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी उपलब्ध करुन टेंभू प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-१०-२०१९) :** (१) होय.

टेंभू प्रकल्पाच्या रु.३,४५०.३५ कोटी खर्चास नियोजन आयोगाने मान्यता दिली असून, केंद्र शासनाने सदर प्रकल्पाचा समावेश बळीराजा जलसंजीवनी योजनेत केला आहे. त्यानुसार मार्च, २०२२ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रु.१२०३.६६ कोटी इतका निधी त्या योजनेअंतर्गत प्राप्त होणार आहे.

(२) होय.

(रु. कोटी)

| सन | एकुण तरतूद/ प्रस्तावित सह | दि.३१/०३/२०१९ अखेर खर्च | राज्यशासन हिस्सा ७५% | केंद्रशासन हिस्सा २५% | निधी मागणी प्रस्ताव सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | ४०४.८३ | २६०.१० | १९५.०७५ | ६५.०२५ | केंद्र शासनास सादर |
| २०१९-२० | मुळ २००+ मागील शिल्लक १४४.७३+ पुरवणी मागणी २००=एकुण ५४४.७३ | काम प्रगतीत | ७५% | २५% | कार्यवाहीत आहे. |

(३) सर्व शीर्षकामे, उघडया पध्दतीच्या कालव्याचे मातीकाम व बांधकाम पूर्ण केली असून अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. शासनाच्या धोरणानुसार वितरण व्यवस्था कामे बंदिस्त नलिकेद्वारे पूर्ण करण्याचे नियोजन केलेले असून, त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा नगरपंचायतीच्या मुख्याधिका-यांवर कारवाई करणेबाबत**

**(३८) १३९३६९ (१३-०७-२०१९). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा नगरपंचायतीचे रस्ते, पाणी, रोजगार, मोकाट गुरांचा प्रश्न तसेच कचरा व्यवस्थापनाबरोबर बांधकामे बंद पडल्यामुळे इथल्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाडा नगरपंचायतीच्या विकासकात अडथळा आणणाऱ्या मुख्याधिका-यांविरोधात वाडावासियांनी तहसिल कार्यालयासमोर माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान लाक्षणिक उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित मुख्याधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१९) :** (१) अशा आशयाच्या तक्रारी नगरपंचायत प्रशासनास प्राप्त झाल्याची वस्तुस्थिती नगरपंचायतीने कळविली आहे.
(२) हे खरे आहे.
• तथापि, मुख्याधिकारी, वाडा नगरपंचायत यांनी स्वत: उपोषणकर्त्यांशी संवाद साधून त्यांना उपोषणापासून परावृत्त केले असल्याचे वाडा नगरपंचायतीने कळविले आहे.
(३) मुख्याधिकारी, वाडा नगरपंचायत यांच्या विरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
• याबाबतच्या चौकशी अहवालाच्या तसेच, शासनस्तरावर यासंदर्भात घेतलेल्या सुनावणीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, वाडा नगरपंचायत यांची अकार्यकारी पदावर बदली करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिकेकडून एल.बी.टी कर चुकीच्या पद्धतीने वसूल करण्यात येत असल्याबाबत

**(३९) १३९४०६ (१३-०७-२०१९). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०११ पासून राज्यात जकात ऐवजी एल.बी.टी लागू करण्यात आला असून सोने चांदी बुलियनला ०.१० टक्के व ०.२० एवढाच आकारण्यात आला परंतु सोने व चांदी मालावर ०.२० ऐवजी ५ टक्के एवढी वाढ करण्यात आली असून ती अन्यायकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अन्यायकारक वाढीबाबत सराफ व्यापारी संघटना यांनी संबंधित अधिकारी यांच्याकडे चौकशी केली असता ही छपाई नजर चुकीने झाली असल्याचे सांगण्यात आले असताना महानगरपालिका अधिकारी यांच्याकडून व्यापाऱ्यांना मात्र ५ टक्के कर आकरून वारंवार नोटीस काढल्या जात असल्याने व्यापाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नजर चुकीने झालेल्या चुकीच्या छपाईची दुरुस्ती करून योग्य कर आकारून नोटिस अदा करण्याबाबत झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरचा एल. बी.टी. कराचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१९) :** (१) नाही. हे खरे नाही.
(२), (३) व (४) शासनाने दि. १८.०२.२०११ च्या अधिसुचनेद्वारे कोल्हापूर मनपामध्ये स्थानिक संस्था कर दरसुची लागू केली सदर दरसुचीमध्ये सोने, चांदी व बुलियन या वस्तूंचे दर ०.१० टक्के दर्शविण्यात आले होते. सन २०११ ते २०१४ या कालावधीत सदर वस्तूच्या दरात कोणताही बदल झालेला नाही.

तथापि, दि. १२.०७.२०१३ च्या कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रस्तावानुसार उपरोक्त वस्तूंच्या दरात शासनाने २०.०१.२०१४ च्या अधिसुचनेन्वये दि. ०१.०४.२०१४ पासून सोने चांदी बुलियनला या वस्तूंचे दर ५ टक्के केले. कोल्हापूर मनपाच्या लक्षात त्यांची चूक आल्यावर दि. १३.०१.२०१५ व दि. १०.०२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी दरसूचीमध्ये बदल करण्यासाठी नव्याने प्रस्ताव सादर केला. परंतू, शासनाने दि. ०१.०८.२०१५ पासून रुपये ५० कोटी वरील व्यापाऱ्यांनाच स्थानिक संस्था कर सूरू ठेवल्यामुळे दरसुचींचे प्रस्तावावर कार्यवाही झालेली नाही.

कोल्हापूर मनपाकडून ५ टक्के दराने कोणत्याही व्यापाऱ्यांस नोटीस बजाविण्यात आलेली नाही. असे मनपाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिंचणी (ता.कडेगांव, जि.सांगली) येथील ताकारी योजनेच्या लाभक्षेत्रात असून सिंचनापासून वंचित असलेल्या भागाला बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी देण्याबाबत**

**(४०) १३९४५४ (११-०७-२०१९). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचणी (ता.कडेगांव, जि.सांगली) येथील ताकारी योजनेच्या लाभक्षेत्रात असून सिंचनापासून वंचित असलेल्या भागाला बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी देण्याबाबतचा आराखडा तयार करण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत आराखडा तयार करण्यात आला आहे काय व त्यानुसार प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-१०-२०१९) :** (१) होय.
(२) ताकारी योजनेच्या लाभक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत बंदिस्त पाईपद्वारे आवश्यकतेनुसार पाणी देण्याचा आराखडा अंतिम करण्याचे काम प्रगतीत असून, त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षेबाबत**

**(४१) १३९८२८ (१५-०७-२०१९). श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन**

**पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगार सुरक्षेसंदर्भातील धोरणात शासनाने सुधारणा केली असली तरी, सुरक्षा विषयक यंत्रणा राबविणे लघु आणि मध्यम उद्योजकांसाठी खर्चीक ठरत असल्याने कामगार सुरक्षेला गौण मानले जात असल्याने छोट्या-छोट्या युनिटमधील लाखो कंत्राटी कामगारांची सुरक्षा अधांतरी असल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योजक कंत्राटी कामगारांच्या माध्यमातून कामे करुन घेत असले तरी कंत्राटी कामगार कायद्यानुसार कंत्राटी कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी ठेकेदाराऐवजी संबंधित कंपनीच्या मालकाची असल्याचे केंद्रीय श्रम संस्थांच्या कार्यालय अध्यक्षांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने खर्च परवडत नसल्याने त्यांच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित उद्योजकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (०१-११-२०१९) :** (१) हे खरे नाही.

कारखाने अधिनियमात नोंदणीकृत असलेल्या सर्व कारख्यान्यांतील कंत्राटी कामगारांसह सर्व कामगारांना कारखाने अधिनियमांतर्गत संरक्षण आहे. त्यामुळे या कामगारांची सुरक्षा अधांतरी नाही. मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरमान्य अशी कोणतेही बाब नव्याने निदर्शनास आलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत कारखान्यातील कंत्राटी कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची नसून कारखान्याच्या भोगवटादाराची आहे.

(३) हे खरे नाही.

कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने खर्च परवडत नसल्याने त्यांच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे हे खरे नाही. कोणत्याही कामगार वा कामगार संघटनेकडून याबाबतचे कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही.

(४) कामगार वा कामगार संघटनेची तक्रार, अपघात व निरिक्षणाच्यावेळी सुरक्षा विषयक प्रत्येक बाबीची सविस्तर चौकशी होऊन संबधीत कारखान्याचे भोगवटादार व व्यवस्थापकांवर कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत फौजदारी स्वरुपाचे खटले न्यायालयात दाखल करण्याची कारवाई केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथील अन्न व नागरी पुरवठा विभागाने बीड येथील शासकीय धान्य गोदामाच्या केलेल्या तपासणीत धान्याचा झालेला गैरव्यवहार

**(४२) १३९८७६ (१०-०७-२०१९). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय या पथकाने दिनांक ७.३.२०१९ ते दिनांक २८.३.२०१९ या कालावधीत शासकीय धान्य गोदाम, बीड ची तपासणी केली असता १८०० क्विंटल धान्याचा गैरव्यहार झाल्याचे सदर पथकाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी अहवाल जिल्हाधिकारी, बीड कार्यालयास सादर केला असून अहवालामध्ये तांदूळ-१८४८.५० क्विंटल, साखर-५२.७७ क्विंटल, तुरदाळ-१०.३० क्विंटल, चनादाळ १६.६७ क्विंटल, उडीद डाळ-८.१० क्विंटल कमी आढळून आल्याने संबंधित गोदाम व्यवस्थापक, अव्वल कारकून (सि.एस.), नायब तहसिलदार (पुरवठा) बीड, तहसिलदार, बीड यांना नोटीस देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दिलेल्या नोटीस संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही करुन यात दोषी असलेल्यांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-०९-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) यामध्ये संबंधित गोदाम व्यवस्थापक, बीड हे दोषी आढळून आल्याने त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे उंद्री ते हारणी (ता.चिखली, जि.बुलढाणा) ह्या रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत

**(४३) १४०००० (११-०७-२०१९). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उंद्री ते हारणी (ता.चिखली, जि.बुलढाणा) हा रस्ता जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत येत असुन सदर रस्ता निकृष्ट दर्जाचा झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार उक्त रस्त्याची दुरूस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सदर रस्ता जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडून दिनांक २८.०२.२०१९ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत झाला आहे.

(२) व (३) सदर रस्ता अंशत: क्षतीग्रस्त झाला असून, अग्रक्रम, निकष व निधी उपलब्धता यावर रस्ते दुरुस्तीचे काम हाती घेणे अवलंबून राहील.

---

### विष्णुपुरी पंपगृह, नांदेड हे विभागीय कार्यालय लातूर येथे स्थलांतरित करण्याबाबत

**(४४) १४०२३१ (१०-०७-२०१९). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड मुख्यालयी कार्यरत असलेल्या विष्णुपुरी पंपगृह विभाग, नांदेड या विभागीय कार्यालयांतर्गतची विष्णुपुरी प्रकल्पाची बहुतांशी कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे औरंगाबाद येथील कार्यरत विभागीय कार्यालय लातूर येथे स्थलांतरित करण्याऐवजी विष्णुपुरी पंपगृह विभाग, नांदेड हे विभागीय कार्यालय अंतर्गतच्या ३ उपविभागीय कार्यालयासह लातूर जिल्ह्यातील बॅरेजेस उभारणी पूर्ण झालेल्या बॅरेजेस परीचलनाच्या व देखभाल दुरुस्तीच्या इत्यादीच्या तदनुषंगिक यांत्रिकी कामासाठी लातूर येथे स्थलांतरित करणेबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालय लातूर येथे स्थलांतरित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-१०-२०१९) :** (१) होय.

(२) विष्णुपुरी पंपगृह, नांदेड हे विभागीय कार्यालय लातूर येथे स्थलांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्ह्यात मटका, जुगार, आणि क्रिकेट बेटिंग मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत

**(४५) १४१३०४ (१३-०७-२०१९). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात मटका, जुगार, आणि क्रिकेट बेटिंग मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी मटक्यावर बंदी आणल्यामुळे मोबाईल व सोशल मिडियावर सर्रासपणे मटका सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचबरोबर कोट्यवधी रुपयांचा बेटिंग जुगारही खेळला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१९) :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर जिल्हयामध्ये पोलीसांची नजर चुकवुन मटका जुगार खेळत असलेल्या इसमांची गोपनीय माहिती मिळवून जानेवारी २०१९ ते मे २०१९ अखेर कालावधीमध्ये मुंबई जुगार कायदा कलम १२ अ, ४ व ५ प्रमाणे एकूण ३४७ केसेस करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये ३५९ आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांचे कब्जातून रू.१,२१,९४,२४१/- किमंतीचा मुद्येमाल जप्त करणेत आला आहे.

करवीर पोलीस ठाणे हद्दीत क्रिकेट बेंटीग घेत असताना ६ इसम मिळून आल्याने करवीर पोलीस ठाणेमध्ये गु.र.नं. २४६/२०१९ मुंबई जुगार कायदा कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला असून रू.२,७६,५००/- किमंतीचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

कोल्हापूर जिल्हयातील वडगांव पोलीस ठाणे हद्दीत दि.३०/०४/२०१९ रोजी मोबाईलवरून मटका घेत असलेचे माहिती मिळालेने पडताळणी केली असता २ इसम मिळून आल्याने त्यांचेवर कारवाई करुन त्यांचेकडून रू.१७,४३०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे.

प्रत्येक पोलीस ठाणेस गुन्हे शोध पथकांची स्थापना करण्यात आली आहे. मटका व जुगार कोणत्याही परिस्थितीमध्ये चालु होणार नाहीत याबाबत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदे शैक्षणिक अर्हताप्राप्त स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक मधून भरण्याबाबत

**(४६) १४१४३९ (११-०७-२०१९). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदे शैक्षणिक अर्हता पात्र स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक मधून विशेष धोरणात्मक बाब म्हणून भरण्याबाबत मा.लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास लेखी विनंतीपत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विनंतीपत्रावर शासनाने निर्णय घेऊन त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात अर्हता, अनुभव प्राप्त स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांची सरळसेवेने विशेष बाब म्हणून थेट भरती करण्याबाबत स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांच्या संघटनेने दि.२९.१०.२०१८ रोजीच्या केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने अभिप्राय दिले आहेत की,सा.प्र.वि.च्या दि.१९.११.२००३ शासन परिपत्रकान्वये शासकीय/निमशासकीय कार्यालये, महामंडळे, सरकारी/स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम इ.अधिपत्याखालील सर्व कार्यालयांतील रिक्त पदे भरतांना सेवायोजन कार्यालयांकडून ज्येष्ठतेनुसार यादी प्राप्त करुन घेण्यात यावी. त्याचबरोबर रिक्त पदांची जाहीरात सर्व प्रसार माध्यमांतून प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात यावेत आणि वरील दोन्ही प्रकारे प्राप्त होणाऱ्या याद्यांमधून/अर्जामधून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी,"असे स्वंयस्पष्ट आदेश आहेत.सबब, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर कार्यरत स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना स्पर्धा परिक्षा न घेता थेट नियुक्ती देणे नियमाधीन नाही. सामान्य प्रशासन विभागाने दिलेले उपरोक्त अभिप्राय विचारात घेता, संघटनेने केलेली मागणी सद्यस्थितीत मान्य करता येणार नाही.तथापि,स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना पदोन्नतीच्या जादा संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कनिष्ठ अभियंता पदाच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धर्माबाद (जि.नांदेड) येथे रेल्वेमार्गावर उड्डाणपूल किंवा भुयारी मार्ग बांधण्याबाबत**

**(४७) १४१८६८ (०५-०७-२०१९). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) या शहरात मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असून येथील रेल्वे गेट क्र.१ व २ प्रत्येक १५ मिनीट ते अर्ध्या तासात बंद होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर दोन्ही ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून उड्डाणपूल किंवा भुयारी मार्ग बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-११-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन रेल्वे गेट क्र.२ रामा-२६८ दर्जाच्या रस्त्यावर असून तेथे ६२००० ते ६३००० TVU रेल्वेची वाहतूक सुरू आहे. तथापी, उड्डाणपूल किंवा भुयारी मार्ग बांधण्यासाठी १००००० TVU पेक्षा जास्त वाहतुक वर्दळ आवश्यक असल्याचे रेल्वे विभागाने कळविले आहे. रेल्वे गेट क्र.१

धर्माबाद नगरपरिषदेच्या हद्दीत असून उड्डाणपूल बांधण्यासाठी धर्माबाद नगरपरिषदे कडून व्यवस्थापक, दक्षिण मध्य रेल्वे विभाग, सिकंदराबाद यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेरणी ते कापणीपर्यंतची शेतीची सर्व कामे मनरेगा अंतर्गत करणेबाबत**

**(४८) १४१९२४ (१६-०७-२०१९). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेरणी ते कापणीपर्यंतची शेतीची सर्व कामे मनरेगा अंतर्गत घेणेबाबत दिनांक १९ जुलै २०१८ रोजी मा. मंत्री (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर (१०-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पेरणी ते कापणी पर्यतची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्याबाबत कृषि विद्यापीठातील तज्ञ व इतर संबधितांचा कार्यकारी गट स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आलेला आहे.
(३) बैठकीत झालेल्या निर्णयानूसार सर्व कृषि विद्यापीठातील तज्ञ, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी व पुरस्कार प्राप्त/प्रगतशिल शेतकरी यांचा कार्यकारी गट स्थापन करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमोडी धरणातून (ता.खेड) उपलब्ध पाणी साठ्याचे ऑडीट करून उपसा सिंचन योजनेद्वारे बंद पाईपलाईन मधून पाणी थिटेवाडी बंधाऱ्यापर्यंत नेण्याबाबत**

**(४९) १४२३२७ (११-०७-२०१९). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमोडी धरणातून (ता.खेड) उपसा सिंचन योजनेद्वारे बंद पाईपलाईन मधून पाणी थिटेवाडी बंधाऱ्यापर्यंत नेण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री,जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी कळमोडी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा प्रकल्प अहवालानुसार प्रत्यक्षात उपलब्ध होत नसल्याचे दिसून येत असल्याने कळमोडी धरणाचे तसेच चासकमान धरणाचे पाण्याचे ऑडीट करून त्यानंतर सातगाव पठार योजनेसाठी पाणी उपलब्ध करून देण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने कळमोडी धरणाचे पाण्याचे ऑडीट करण्यासह बंद पाईपलाईन द्वारे थिटेवाडी बंधाऱ्यापर्यंत पाणी सोडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-१०-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) बंद पाईपलाईन द्वारे थिटेवाडी बंधा-यापर्यंत पाणी सोडण्यासाठी होणा-या अतिरिक्त क्षेत्राचे सर्वेक्षणाचे काम करण्याची निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली असून, दिनांक ०३.०६.२०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच सातगाव पठार उसिंयो मध्ये समावेश करण्यच्या प्रस्तावित १२ गावांचे सर्वेक्षण माहे डिंसेबर-जानेवारी २०२० पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. विस्तृत सर्वेक्षणानंतर पाण्याची उपलब्धता तपासून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील काही गावांत मोठ्या प्रमाणात अवैध दारु विक्री होत असल्याबाबत**

**(५०) १४२६४५ (१५-०७-२०१९). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील बा-हे, हस्ते, अबोडे, मनखेड, गहाळे, खडकमाळ, गोपाळपूर, खडकी, आमदा इत्यादी गावांत मोठ्या प्रमाणात अवैध दारु विक्री होत असल्यामुळे या गावातील महिलांनी दारु विक्री कायमची बंद करण्यासाठी संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही बा-हे पोलीस स्टेशनकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे एपिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावात सुरु असलेले अवैध दारु दारु विक्री बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ६०४ (39)

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

बाऱ्हे पोलीस ठाणे हद्दीतील गावातील महिलांनी दारु विक्री कायमस्वरुपी बंद करण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर लेखी स्वरुपात अगर इतर प्रकारे अशी कोणतीही मागणी केलेली नाही.

(२) तसेच बाऱ्हे पोलीस ठाणे हद्दीत बाऱ्हे पोलीस ठाणेच्या वतीने चोरटया रितीने अवैधरित्या दारु विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची माहिती काढुन त्यांचेवर वेळोवेळी छापे टाकुन दारुबंदी कायदयान्वये सन-२०१९ मध्ये १७ केसेस दाखल करण्यात आलेल्या असून अवैधरित्या दारुची विक्री करणारे १७ इसमांना अटक करण्यात येऊन त्यांचेकडून रू.१,५७,४५४/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.